नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १३० | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com

AROTE Dental Clinic
smile more..live more..



डॉ. सौ. स्वप्नाली अतुल आरोटे (तांबे)
B.D.S. (Dental Surgeon)
Reg.No.: A-17501
दंतरोग तज्ञ
वेळ : सकाळी १० ते दुपारी १ व संध्याकाळी ५ ते ८
उपलब्ध उपचार
* रुट कॅनॉल ट्रीटमेंट
* हिरड्यांवरील उपचार व शस्त्रक्रिया
* वेडेवाकडे दात सरळ करण्याचे उपचार
* दात व जबड्यांवरील शस्त्रक्रिया
* कृत्रिम दंतरोपण शस्त्रक्रिया
* लहान मुलांच्या दातांवरील उपचार
पत्ता : ओम शांती बिल्डिंग, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि.अ.नगर
फोन : (०२४२४)२२२३४३

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी


संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net

शुक्रवार, दि. १० एप्रिल २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## शिंदेंवरील गाणे व्यवसायाचा भाग

### विनोद करणे हा व्यवसाय : विशेषाधिकार समितीसमोर कुणाल कामराचे स्पष्टीकरण



मुंबई: (स. गांवकरी)

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरील ‘ठाणे की रीक्षा’ या गाण्यामुळे वादग्रस्त ठरलेल्या स्टॅण्ड अप कॉमेडियन कुणाल कामरा याची विधिमंडळाच्या विशेषाधिकार समितीसमोर साक्ष नोंदविण्यात आली. या साक्षीवेळी कुणाल कामरा यांनी आपण कोणतीही चूक केलेली नसल्याचे ठामपणे सांगितले. हे गाणे हा आपल्या व्यावसायिक क्षेत्राचा भाग असून त्यातून व्यंग मांडण्यात आल्याचे त्याने आपल्या साक्षीत स्पष्ट केले.

विशेषाधिकार समितीचे अध्यक्ष प्रसाद लाड यांच्यासमोर ही सुनावणी पार पडली. बैठकीत हक्कभंग आणणारे भाजप आमदार प्रवीण दरेकर आणि कामरा यांच्या साक्षी झाल्या. सुनावणीदरम्यान मराठीतून मांडण्यात आलेले मुद्दे कळावेत म्हणून कुणाल कामरा याने सोबत भाषांतरकारही आणला होता. त्यांनी मुद्दे समजावून सांगितल्यानंतरच कामरा मुद्द्याला उत्तर देत होता.

यावेळी प्रसाद लाड यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना आपण कोणतीही चूक केली नसल्याचे कामरा याने ठामपणे सांगितले. यावेळी कुणाल कामरा याला बिनशर्त माफी मागण्यास सांगण्यात आले असता त्याने याला आपल्या वकिलामार्फत उत्तर देणार असल्याचे सांगितले. विधिमंडळाने पुढील निर्णयापूर्वी अतिरिक्त कागदपत्रे सादर करण्याची विनंती केली असल्याची माहिती प्रसाद लाड यांनी सुनावणीनंतर दिली

समितीने यापूर्वी सहा प्रकरणांवर निर्णय दिला असून एका प्रकरणात शिक्षा सुनावण्यात आली आहे. कमरा यांच्या वर्तनाबाबत बोलताना त्यांनी नमूद केले की, सुनावणीदरम्यान ते पूर्णपणे नम्र होते. मराठीत विचारलेल्या प्रश्नांचे अचूक आकलन होण्यासाठी त्यांनी भाषांतरकाराची मदत घेतली.

आता समितीसमोर सादर केलेल्या कागदपत्रांचा आढावा घेऊन कमरा यांचे कृत्य विशेषाधिकार भंगात मोडते की ते व्यावसायिक व्यंगात्मक अभिव्यक्तीचा भाग आहे, यावर अंतिम निर्णय घेणार असल्याचे प्रसाद लाड म्हणाले. दरम्यान कुणाल कामराने घातलेल्या टी-शर्टचीही चर्चा रंगली. त्याने साक्षीदरम्यान परिधान केलेल्या टीशर्टवर I am not bad, you just don’t like me असे लिहिले होते. यावर विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना प्रसाद लाड यांनी त्याच्या टीशर्टवर काय लिहलेय हे वाचलेले नाही. आपण सुनावणीसाठी आलो असल्याचे नमूद केले.

### सुषमा अंधारे यांची सुनावणी आठवडाभराने

सुषमा अंधारे यांच्याविरोधातील हक्कभंगाप्रकरणी सुनावणी आठवडाभराने होणार आहे. त्या आजारी असल्याचे त्यांनी कळवले असून त्यांच्या सुनावणीची तारीख त्यानुसार ठरवली जाणार असल्याचे लाड यांनी सांगितले.

### पक्ष संघटनेत बदल करण्याचे शिंदे यांचे संकेत

शिवसेना शिंदे पक्षात महत्वाची पदे घेऊन मिरवण्यात धन्यता मानणारे काही पदाधिकारी एकनाथ शिंदे यांच्या रडारवर आले आहेत. मंत्रीमंडळातील पक्षाच्या काही मंत्र्यांविषयी गंभीर तक्रारी आहेत. पक्ष वाढीसाठी मेहनत न घेणाऱ्या काही पदाधिकाऱ्यांना नारळ देण्याचा शिंदे यांचा विचार आहे. त्यासाठी ‘काम नाही तर पद नाही’ असा कारवाईपूर्वीचा इशारा शिंदे यांनी सर्व पदाधिकाऱ्यांच्या ऑनलाईन बैठकीत दिला आहे. राज्यातील सर्व निवडणूका पार पडलेल्या आहेत. तीन वर्षानंतर लोकसभा निवडणूक होणार आहे. त्याच्या तयारीला शिवसेना शिंदे पक्ष लागला आहे. शिंदे पूत्र खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी पक्षाची धुरा सांभाळण्यास सुरुवात केली आहे.

## मुकुल चौधरीनं उत्तुंग फटकेबाजीच्या जोरावर एकहाती फिरवला सामना



मुंबई : (स. गांवकरी)

मुकुल चौधरीच्या नाबाद अर्धशतकाच्या जोरावर लखनौ सुपर जाएंट्सच्या संघाने घरच्या मैदानावर खेळणाऱ्या कोलकाता नाईट रायडर्सला ३ विकेट्स राखून पराभूत केले. कोलकाता नाईट रायडर्सच्या संघाने ४ विकेट्सच्या मोबदल्यात १८१ धावा करत लखनौच्या संघासमोर १८२ धावांचे टार्गेट सेट केले होते. अखेरच्या दोन चेंडूत ७ धावांची गरज असताना मुकुल चौधरी याने वैभव अरोराच्या पाचव्या चेंडूवर षटकार मारत सामना बरोबरीत आणला. अखेरच्या चेंडूवर एक धाव घेत त्याने संघाचा विजय निश्चित केला. त्याच्याशिवाय या सामन्यात आयुष बडोनी यानेही उर्धशतकी खेळी साकारली. कोलकाताच्या संघाने दिलेल्या १८२ धावांचा पाठलाग करताना अखेरच्या २ षटकात लखनौसुपर जाएंट्सच्या संघाला ३ विकेट्स हातात असताना ४० धावांची गरज होती. १९ व्या षटकात त्याने कॅमरुन ग्रीनच्या षटकात दोन षटकारांसह एका चौकाराच्या मदतीने १६ धावा कुटल्या. वैभव सूर्यवंशी घेऊन आलेल्या अखेरच्या षटकात पहिल्याच चेंडूवर आवेश खान याने त्याला एकेरी धाव काढत स्ट्राईक दिले. या षटकात दुसऱ्या चेंडूवर उत्तुंग षटकार मारत मुकुल चौधरी याने संघाला विजयाच्या आणखी जवळ नेले. या षटकारानंतर दमदार कमबॅक करत वैभव अरोरानं दोन निर्धाव चेंडू टाकले. पण दबावात पाचव्या चेंडूवर षटकार मारत त्याने कोलकाताच्या बाजूनं झुकलेला सामना लखनौच्या बाजूनं वळवला. त्याने २७ चेंडूत २ चौकार आणि ७ षटकारांच्या मदतीने नाबाद ५४ धावांची खेळी साकारली. याशिवाय आयुष बडोनी याने ३४ चेंडूत ७ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने ५४ धावा केल्या.

## थोडक्यात...

### रायगडमध्ये भात खरेदीत मोठी घट

अलिबाग (स. गांवकरी) : कोकणातील भात उत्पादनासाठी प्रसिद्ध असलेल्या रायगड जिल्ह्यात यंदाच्या हंगामात भात खरेदीत मोठी घट नोंदवली गेली आहे. पावसाचा लांबलेला कालावधी, सततचा ओलावा आणि कापणीच्या काळात झालेल्या अतिवृष्टीमुळे भात पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. यामुळे अनेक शेतकऱ्यांचा भात सरकारी निकषांनुसार पात्र ठरला नाही आणि हजारो शेतकरी किमान आधारभूत किंमत (एमएसपी) योजनेपासून वंचित राहिले. यंदा जिल्ह्यात केवळ ६.०१ लाख क्विंटल भाताची खरेदी झाली असून, मागील वर्षाच्या तुलनेत ही संख्या लक्षणीयरीत्या कमी आहे. जिल्ह्यातील ३९,५७२ शेतकऱ्यांनी नोंदणी केली होती, मात्र त्यापैकी फक्त २७,७४६ शेतकऱ्यांकडूनच प्रत्यक्ष खरेदी करण्यात आली. म्हणजेच सुमारे १२ हजारांहून अधिक शेतकरी खरेदी प्रक्रियेपासून वंचित राहिले आहेत.


### पोटनिवडणुकीतून माघार नाही : मुंडे

बारामती (स. गांवकरी) : राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर बारामतीमध्ये विधानसभेची पोटनिवडणुक आहे. ही पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी सर्व प्रयत्न केले जात होते. महायुतीकडून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार निवडणुकीच्या मैदानात आहेत. काँग्रेसकडून या निवडणुकीत उमेदवार देण्यात आला होता. कारण, ही निवडणूक बिनविरोध व्हावी, याकरिता सर्व प्रयत्न सुरु होते. नंतर काँग्रेसनेही माघार घेतली. पण स्वराज्य शक्ती सेना राष्ट्रीय पक्षाच्या नेत्या करुणा मुंडे यांनी केलेल्या वक्तव्याने सर्वांचे लक्ष वेधले आहे. बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत उमेदवारी कायम ठेवण्याचा ठाम निर्णय स्वराज्य शक्ती सेना राष्ट्रीय पक्षाच्या नेत्या करुणा मुंडे यांनी जाहीर केला आहे. करुणा मुंडे यांनी एका विशेष बाईटमध्ये सांगितले की, “राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी मला बारामतीतून माघार घेण्यासाठी सांगितले होते. मात्र मी एक पोस्ट पाहिली आणि त्यानंतर मी माझा अर्ज कायम ठेवण्याचा निर्णय घेतला.” त्यांनी स्पष्ट केले की, “धनंजय मुंडे यांनी हर्षवर्धन सपकाळ यांच्याशी बोलणी केल्यानंतर काँग्रेसने माघार घेतल्याची पोस्ट मी पाहिली. त्यामुळे मीही माघार घेणार नाही.” करुणा मुंडे यांनी आपल्या भूमिकेवर ठाम राहत सांगितले, “अजित पवारांना आम्हाला न्याय द्यायचा आहे, पण सुनेत्रा पवार आणि त्यांचे मुलगे अपघाताविषयी काहीही बोलत नाहीत. मोठे सत्ताधारी न्याय देऊ शकत नाहीत, त्यांना सत्तेत बसण्याचा हक्कच नाही.”

### फडणवीसांच्या साक्षीने ‘कोल्ड वॉर’!

नागपूर (स. गांवकरी) : नागपूरजवळील जामठा येथे ज्येष्ठ नेते दत्ता मेघे यांच्या श्रद्धांजली सभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सह राज्यातील दिग्गज नेते एकत्र आले असताना, माजी गृहमंत्री अनिल देशमुख आणि मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांची उपस्थिती विशेष ठरली; मात्र दोघांनीही एकमेकांकडे दुर्लक्ष करून पाठ फिरवली. सर्वपक्षीय श्रद्धांजली सभेत अनेक मान्यवर उपस्थित असताना देशमुख आणि सिंह यांची एकाच व्यासपीठावर उपस्थिती लक्षवेधी ठरली. मंचावर आल्यानंतर देशमुख यांनी इतर नेत्यांना नमस्कार करत संवाद साधला; मात्र समोर बसलेल्या परमबीर सिंह यांच्याकडे त्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. सिंह यांनीही तशीच भूमिका घेतल्याचे दिसून आले.

## ई – केवायसी रखडलेल्या आपत्ती बाधितांना मोठा दिलासा



मुंबई : (स. गांवकरी)

अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, पूरस्थितीसह विविध नैसर्गिक आपत्ती बाधितांना राज्य सरकारच्या वतीने आर्थिक मदत दिली जाते. पण, २०२१ पासून पात्र लाभार्थ्यांची विविध कारणांमुळे ई – केवायसी रखडली होती. अशा ई-केवायसी रखडलेल्या सुमारे साडेचार लाख लाभार्थ्यांना सुमारे ३६४ कोटी रुपयांच्या निधीचे वितरण करण्यात आले आहे. आपत्ती बाधितांना महाडीबीटीद्वारे थेट आर्थिक मदत देण्यात येते. गतवर्षीच्या अवकाळी, अतिवृष्टी आणि पूरबाधितांना ॲग्रीस्टॅक योजनेच्या माहितीचा आधार घेऊन तत्काळ मदत वितरण करण्यात आली. पण, २०२१ पासून राज्यातील लाखो पात्र लाभार्थ्यांना ई- केवायसी नसल्यामुळे मदत मिळाली नव्हती. पण, या सर्व लाभार्थ्यांची विशेष मोहिम राबवून ई- केवायसी पूर्ण करण्यात आली. अशा ४ लाख ४० हजार २२ शेतकऱ्यांना ३६४ कोटी ३७ लाख रुपयांची मदत करण्यात आली आहे.

यासह नोव्हेंबर २०२५ मध्ये अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पात्र लाभार्थ्यांनाही मदत करण्यात आली आहे. नाशिक जिल्ह्यासाठी ६.३७ कोटी रुपये, तर जळगाव जिल्ह्यातील लाभार्थ्यांसाठी १०.४१ कोटी रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे. यंदाच्या फेब्रुवार महिन्यात चंद्रपूर जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झाले होते, त्यापोटी १.८५ कोटी रुपयांची आर्थिक मदत वितरीत करण्यात आली आहे.

## राज्यातील ३४ हजार कलावंतांना यंदा शासनाचा ‘मदतीचा हात’

मुंबई : (स. गांवकरी)



राज्यातील आर्थिक द्दष्टया दुर्बळ कलावंतांची संख्या झपाटयाने वाढत आहे. सरकारच्या वतीने दरवर्षी देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीत यंदा कमालीची भर पडली आहे.वर्षभरात ३४ हजार कलावंतांना दरमहा पाच हजार रुपये प्रमाणे मदतीचा हात देण्यात आला आहे. विविध कलाकारांची मोठी परंपरा असलेल्या राज्यातील संगीत, नाटक, लोककला, चित्रकला, शिल्पकला आणि नृत्य क्षेत्रातील कलाकारांना ही मदत दिली जाते. सरकारने यंदा या मदतीवर सुमारे २०४ कोटी खर्च केले. राज्यातील जेष्ठ आणि आर्थिक द्दष्टया दुर्बळ साहित्यिक व कलाकरांना शासनाच्या वतीने आर्थिक मदत देण्याची योजना (१९५५) जुनी आहे. साहित्यिक व कलाकरांच्या अ, ब, क, ड श्रेणीनुसार ही मदत दिली जात होती. त्यावेळी आर्थिक मदत घेणारे कलाकार अतिशय कमी (६०) होते. आर्थिक अडचणीमुळे अनेक कलाकर हालाखीचे दिवस काढत असल्याचे आढळून आले होते. शासनाने २०२४ मध्ये या योजनेत सुधारणा केली. कलाकारांसाठी निश्चित करण्यात आलेली श्रेणी रद्द करण्यात आली. सरसकट सर्वच पात्र कलाकारांना आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला. दरमहा आर्थिक मदतीची रक्कम पाच हजार रुपये केली. श्रेणी रद्द केल्याने तसेच रक्कम वाढवली गेल्याने मदत घेणाऱ्यांची संख्या झपाटयाने वाढत आहे. संगीत, नाटक, लोककला, चित्रकला आणि शिल्पकला या कला क्षेत्रातील कमीत कमी १५ ते २० वर्षाचा अनुभव असलेल्या कलाकाराला ही आर्थिक मदत दिली जाते. त्यासाठी या कलाकराची आर्थिक स्थिती दुर्बळ आणि ५० वर्षाची अट हे दोन प्रमुख निकष आहेत. उत्पन्नाचे दुसरे साधन नसलेल्या कलाकरांना हा लाभ दिला जातो.

राज्यातील जिल्हा पातळीवर या कलाकरांच्या अर्जाची छाननी केली जाते. आर्थिक मदतीची रक्कम वाढल्यानंतर गेल्या दोन वर्षात लाभ घेणाऱ्या कलाकारांची संख्या वाढली आहे. ती आता ३४ हजाराच्या घरात गेली आहे. प्रत्येक जिल्हानिहाय १०० कलाकरांचे अर्ज मागवण्यात आलेले आहेत. या मदतीसाठी सरकारने या वर्षी २२५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

याशिवाय शासनाने जिल्ह्यातील जेष्ठ कलाकारांसाठी १०० अर्जांची मर्यादा ठेवली आहे. राज्यातील कानाकोपऱ्यातून या मदतीसाठी अर्ज येत असतात. काही कलाकारांचे निधन होत असल्याने ही संख्या कमी होते पण नवीन येणारे अर्जांची संख्या दरवर्षी वाढत असल्याचे एका उच्च अधिकाऱ्याने सांगितले.

### कांद्यावर होणार प्रक्रिया


गत दोन वर्षांत कांदा दरात झालेल्या घसरणीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. शेतकऱ्यांना सुमारे १४०० कोटी रुपयांची मदत करण्यात आली. पण, दरातील चढ – उतार दरवर्षीचा प्रश्न आहे. त्यामुळे दरवर्षी किमान २५ लाख टन कांद्यावर प्रक्रिया करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी सुमारे ८०० कोटी रुपयांची गरज लागेल, अशी माहिती पणन मंत्री जयकुमार रावळ यांनी दिली. सह्याद्री अतिथीगृह येथे एस – ४- एस टेक्नॉलॉजीजच्या प्रतिनिधींशी झालेल्या बैठकीत मंत्री रावळ यांनी कांदा प्रक्रिया व साठवणुकीच्या उपाययोजनांवर सविस्तर चर्चा झाली. या बैठकीस महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) आणि मे. एस -४- एस टेक्नॉलॉजीजचे प्रतिनिधी उपस्थित होते. राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना कांदा दरातील चढ -उतारांपासून संरक्षण मिळून स्पर्धात्मक दर मिळण्यासाठी कांदा प्रक्रिया उद्योगाला चालना देण्याची गरज आहे. पण, एक, दोन लाख टनांवर प्रक्रिया करून उपयोग नाही. किमान २५ लाख टन कांद्यावर प्रक्रियेची गरज आहे.

## ‘लेबनान’बरोबर शांतता चर्चेंचे नेतान्याहू यांचे आदेश

### भीषण रक्तपातानंतर इस्रायलची मोठी घोषणा

(स. गांवकरी)

लेबनानवर केलेल्या प्राणघातक हवाई हल्ल्यांमध्ये शेकडो नागरिकांचा मृत्यू झाल्यानंतर आता इस्रायलने लेबनानबरोबर शांतता चर्चा करण्याची तयारी दर्शवली आहे. इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी सरकारी प्रतिनिधींना लेबनानबरोबर शांतता चर्चा सुरु करण्याचे निर्देश दिले आहेत. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, बुधवारी इस्रायलने लेबनानवर केलेल्या जवळपास १०० हवाई हल्ल्यांमध्ये २५० नागरिकांचा मृत्यू झाला होता. इराणबरोबर झालेल्या शस्त्रसंधीनंतर इस्रायलने केलेल्या या हल्ल्यांवरुन इराणने प्रश्न उपस्थित केले होते. इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी आपल्या सरकारला लेबनानबरोबर शांतता चर्चा सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. बीरूतकडून वारंवार संपर्क साधण्याच्या प्रयत्न केला जात होता, त्याला प्रसिसाद म्हणून चर्चेचे पाऊल उचलण्यात आल्याचे नेतान्याहू यांनी म्हटले आहे. इराणबरोबर शस्त्रसंधीची घोषणा केल्यानंतर यात लेबनानचा देखील समावेश असल्याचे इराण आणि पाकिस्तानने देखील म्हटले होते. पण, इस्रायलकडून हा दावा फेटाळण्यात आला व लेबनानवर हल्ले सुरुच ठेवण्यात आले. या हल्ल्यांमध्ये आत्तापर्यंत शेकडो नागरिकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.



“लेबनानकडून चर्चेसाठी वारंवार विनंती करण्यात येत आहे, या विनंतीचा विचार करुन मी माझ्या सरकारला लेबनानबरोबर लवकरात लवकर थेट चर्चा सुरु करण्याचे निर्देश दिले आहेत. वाटाघाटी प्रामुख्याने हेझबोल्लाहला निःशस्त्र करणे आणि इस्रायल आणि लेबनान यांच्यात शांततापूर्ण संबंध प्रस्थापित करणे यावर भर दिला जाईल. लेबनानच्या पंतप्रधानांनी बीरूतचे निःशस्त्रीकरण करण्याबाबत केलेल्या आवाहनाचे इस्रायल कौतुक करतो”, असे नेतान्याहू यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

नेतान्याहू यांच्या घोषणेच्या अगदी काही वेळ अगोदर, लेबनानचे अध्यक्ष जोसेफ औन यांनी युद्धविरामावर भाष्य केले होते. “हिंसाचार थांबत नाही तोपर्यंत गोष्ट पुढे जाणार नाहीत आणि कोणत्याही गंभीर चर्चेसाठी युद्धविराम हाच मूलभूत उपाय आहे”, असे जोसेफ औन यांनी स्पष्ट केले होते. संघर्षावर तोडगा काढण्यासाठी थेट संवाद करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही असेही मत त्यांनी मांडले होते. यासाठी इस्रायसोबत संवाद साधून चर्चेला त्यांना तयार करण्याचे प्रयत्न सुरु असल्याचे औन यांनी म्हटले होते.

### हजारो नागरिकांचा मृत्यू, हजारो जखमी

इस्रायलने लेबनानवर सुरु हल्ले सुरु केल्यापासून १,७०० नागरिकांचा मृत्यू झाल्याचा दावा करण्यात आला आहे. हजारो लोक जखमी झाले आहेत तर लाखो नागरिकांनी घर सोडून स्थलांतर केले आहे. बुधवारी इस्रायलने लेबनानवर केलेल्या १०० हून अधिक हल्ल्यांमध्ये २५० नागरिकांचा मृत्यू झाला होता. तसेच, इस्रायली हल्ल्यांमध्ये ४०० हेझबोल्लाचे बंडखोर ठार झाल्याचे स्थानिक वृत्तपत्रांनी म्हटले आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे





## दिवाणे यांच्या मातोश्रींचे निधन; डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या वतीने श्रद्धांजली!

आळंदी (स. गांवकरी) : पुणे जिल्ह्यातील तीर्थक्षेत्र आळंदी येथील थोर समाजसेवक व दानशूर व्यक्तिमत्व नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांचे समर्थक, माजी नगरसेवक तथा सामाजिक कार्यकर्ते मनोहरराव दिवाणे यांच्या मातोश्रींचे वृद्धापकाळाने निधन झाले. या दुःखद प्रसंगी दिवाणे परिवाराची भेट घेऊन डॉ. विश्वासराव आरोटे (राज्य सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ तथा दैनिक समर्थ गांवकरी संपादक) यांनी पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. यावेळी अशोकराव उगले (तालुकाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ) तसेच मनोहरराव दिवाणे उपस्थित होते. दिवाणे परिवारावर ओढवलेल्या दुःखात सहभागी होत उपस्थित मान्यवरांनी दिवंगत आत्म्यास भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## रंगूबाई एकनाथ खामकर यांचे निधन




श्रीगोंदा (स. गांवकरी) : तालुक्यातील घारगाव येथील रंगूबाई एकनाथ खामकर यांचे निधन झाले. त्या ७० वर्षांच्या होत्या. अत्यंत कष्टातून त्यांनी आपले कुटुंब उभे केले होते. त्या बेलवंडी स्टेशन जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक बापूराव खामकर यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात मुलगा, सून आणि नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## राहुरी विधानसभा पोटनिवडणूक अखेर बिनविरोध नाहीच ! सात उमेदवार रिंगणात

राहुरी (स. गांवकरी) : अखेर अनपेक्षित अशा राहुरी विधानसभा मतदार संघासाठी ट्विस्ट पहावयास मिळाला. बिनविरोध होणार अशी चर्चा असताना अखेर राहुरीची पोट निवडणूक बिनविरोध होणार नसल्याचे स्पष्ट झाले. विधानसभेच्या राहुरीच्या जागेसाठी तीन राजकीय पक्षांसह चार अपक्ष असे सात उमेदवार निवडणूक रिंगणात उभे राहिले आहेत . बारामती व राहुरी विधानसभा पोटनिवडणूक बिनविरोध होणार असल्याच्या चर्चा व त्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण प्रयत्न झाले . मात्र अनेक राजकीय घडामोडी घडल्यानंतर दुपारी बारामती , राहुरी विधानसभा पोट निवडणूक बिनविरोध होणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे .राहुरी विधानसभा पोटनिवडणूक बिनविरोध न झाल्याने आता पुढील राजकीय हालचाली सुरू झाल्या आहेत . राहुरीकरांना 1998 नंतर पुन्हा एकदा पोटनिवडणूक पहावयास मिळत आहे.

## दिव्यांगांसाठी ८ लाखांचा निधी; विविध योजनांना चालना



किनवट (स. गांवकरी) : किनवट नगर परिषदेकडून शहरातील दिव्यांग नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी २०२५–२६ या आर्थिक वर्षात सुमारे ८ लाख रुपयांचा निधी वाटप करण्यात येणार असल्याची माहिती नगराध्यक्ष सुजाता येंड्रलवार, मुख्याधिकारी मुगाजी काकडे, लेखापाल चक्रपाणी कदम तसेच कर्मचारी विद्या वाघमारे यांनी दिली. नगर परिषदेकडून दिव्यांगांसाठी राखीव ठेवण्यात येणाऱ्या ५ टक्के निधी अंतर्गत हा निधी उपलब्ध करून देण्यात येत असून, शहरातील पात्र दिव्यांग नागरिकांना विविध योजनांद्वारे थेट लाभ देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या निधीतून दिव्यांग व्यक्तींना आवश्यक असणारी व्हीलचेअर, ट्रायसायकल, श्रवणयंत्र, कृत्रिम अवयव यांसारखी सहाय्यक साधने उपलब्ध करून दिली जाणार आहेत. तसेच स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी आर्थिक मदत, कौशल्य विकास प्रशिक्षण, तसेच शैक्षणिक गरजांसाठी सहाय्य दिले जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. नगराध्यक्ष सुजाता येंड्रलवार यांनी सांगितले की, “दिव्यांग नागरिकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे हा नगर परिषदेचा प्रमुख उद्देश आहे. या निधीच्या माध्यमातून त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी ठोस पावले उचलली जात आहेत.” मुख्याधिकारी मुगाजी काकडे यांनीही सांगितले की, पात्र लाभार्थ्यांनी नगर परिषदेत अर्ज सादर करून या योजनांचा लाभ घ्यावा. यासाठी आवश्यक कागदपत्रांमध्ये दिव्यांगत्व प्रमाणपत्र, आधार कार्ड, उत्पन्न दाखला व बँक खात्याची माहिती आवश्यक राहणार आहे. नगर परिषद प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, या निधीचा वापर पारदर्शक पद्धतीने करून अधिकाधिक दिव्यांग नागरिकांपर्यंत लाभ पोहोचविण्यावर भर देण्यात येणार आहे. तसेच शहरातील सार्वजनिक ठिकाणी दिव्यांग अनुकूल सुविधा उभारण्याचाही विचार करण्यात येत आहे. किनवट शहरातील दिव्यांग नागरिकांसाठी ही योजना दिलासादायक ठरणार असून, त्यांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणाला यामुळे मोठी मदत होणार असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## जेष्ठ नागरिक हणमंतराव नायगावे यांचे दुःखद हृदय विकाराने निधन



नांदेड (स. गांवकरी) : जिंदनगगर गोपाळचावडी ता. जि. नांदेड येथील जेष्ठ नागरिक हणमंतअप्पा शंकरराव नायगावे यांचे वयाच्या वय-६० व्या वर्षी हृदयविकाराने ९ एप्रिल रोजी पहाटे ३ च्या सुमारास त्यांच्या राहत्या घरी जिंदमनगर गोपाळचावडी येथे हृदय विकाराच्या तिव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर गुरुवारी दि ९ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजता गोपाळचावडी समशान भुमी येथे त्यांच्या वर अंत्यसंस्कार करण्यात आले असून हनमंत अप्पा हे मनमिळावू हसमुख दिलखुलास स्वभावाचे असल्यामुळे गोपाळचावडी परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे तर त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले,सून व नातवंडे असा परिवार आहे ते शिवराज नायगावे व भाजपाचे कार्यकर्ते श्याम नायगावे यांचे ते वडील होते.

# ग्रामीण रुग्णालय १ मे पासून सुरू होणार : आ. शरद सोनवणे

ओतूर : (स. गांवकरी)



कल्याण अहिल्यानगर महामार्गावर जुन्नर तालुक्यातील ओतूर येथे १४ कोटी रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या ग्रामीण रुग्णालयाचे उद्घाटन १ मे ‘महाराष्ट्र दिनी’ होणार असल्याची माहिती जुन्नरचे आमदार शरददादा सोनवणे यांनी दिली.

गुरुवार दि. ९ एप्रिल रोजी त्यांनी येथील ग्रामीण रुग्णालयात भेट देऊन पाहणी दौरा केला. यावेळी सहसंचालक आरोग्य सेवा आयुक्तालय मुंबईच्या डॉ. सरीता हजारे, सहसंचालक प्राथमिक रूग्णलय आयुक्तालय मुंबईचे डॉ. गोलाई, उपसंचालक आरोग्य सेवा परीमंडल पुणेचे डॉ. भगवान पवार, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागनाथ एमपल्ली, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रामचंद्र हंकारे, तालुका आरोग्य अधिकारी अश्विनी कुलमेथे, अधिक्षक डॉ. श्रीहरी सारोक्ते, जुन्नर पंचायत समितीच्या सभापती कमल शेलकंदे, उपसभापती अमित ढोले,जिल्हा परिषदेच्या सदस्या छाया तांबे, पंचायत समिती सदस्य प्रशांत डुंबरे, माजी जिल्हा परिषद सदस्य मोहित ढमाले, विशाल तांबे, दिलीप डुंबरे, विनायक तांबे, धनंजय डुंबरे, अनिलशेठ तांबे, जालिंदर पानसरे, बाळासाहेब घुले, अनुराग फापाळे, जेष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी, शिवसेना व राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार शरददादा सोनवणे म्हणाले की, “स्वर्गीय उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रयत्नातून ओतूर येथे १४ कोटी रुपये खर्च करुन ग्रामीण रुग्णालयाची इमारत उभी आहे. परंतु अडीच वर्ष होऊनही हे रुग्णालय सुरू न झाल्याने जेष्ठ नागरिक संघाने १ मे रोजी उपोषणाचा इशारा दिला होता. तसेच ग्रामस्थांची देखील रुग्णालय सुरू करण्याची मागणी होती. याविषयी आरोग्यमंत्री प्रकाशराव आबिटकर यांच्याशी चर्चा केली. त्यानुसार आज आरोग्य अधिकाऱ्यांसह येथील रुग्णालयाचा पाहणी दौरा केला. त्यानुसार १ मे ‘महाराष्ट्र दिनी’ या ग्रामीण रुग्णालयाचे उद्घाटन होऊन आरोग्य सेवा होणार आहे. या रुग्णालयात १०० बेड असायला हवे होते, परंतु सध्या ३० बेडची व्यवस्था करण्यात आली आहे. परंतु लवकरच १०० बेड उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करणार आहे. तसेच ट्रामा केअर सेंटरची सेवा देखील या रुग्णालयात उपलब्ध झाली पाहिजे. रुग्णांना इतर कोठेही जायला लागणार नाही. बिबट्या संबधी लस, सर्पदंश लस अशा सर्व प्रकारच्या सेवा याठिकाणी उपलब्ध झाल्या पाहिजेत. यासाठी मी प्रयत्नशील असणार आहे.” यावेळी उपस्थित जेष्ठ नागरिक व ग्रामस्थांनी रुग्णालयाचे नुसते उद्घाटन नको, सेवा सुरू झाली पाहिजे असा आग्रह धरला. यावर आमदार सोनवणे यांनी रुग्णालयात स्टाफची व्यवस्था करून रुग्णांना सेवा सुरू होणार आहे. असे आश्वासित केले. त्यामुळे जेष्ठ नागरिक संघाने १ मे रोजी करण्यात येणारे उपोषण मागे घेत असल्याचे जाहीर केले.

## आमदार रोहित पवारांच्या नेतृत्वाखाली मंत्रालयात बैठक



कर्जत : (स. गांवकरी)

कर्जत तालुक्यातील नागरिकांना आणि पक्षकारांना स्थानिक स्तरावर न्याय मिळावा, यासाठी मंजूर करण्यात आलेले 'अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय' लवकरात लवकर सुरू व्हावे, याकरिता शासन दरबारी अत्यंत सकारात्मक पाऊल उचलण्यात आले. कर्जत जामखेडचे आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली कर्जत तालुका वकील संघाच्या एका शिष्टमंडळाने बुधवारी मुंबईतील मंत्रालयात विधी व न्याय विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. या बैठकीत विधी व न्याय विभागाने शासकीय स्तरावरील उर्वरित प्रक्रिया तातडीने पूर्ण करून कर्जत येथे न्यायालय सुरू करण्याची महत्त्वपूर्ण हमी दिली आहे. कर्जत येथे उच्च न्यायालयाने अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाला यापूर्वीच मंजुरी दिली आहे. मात्र, त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि कार्यालयीन कामकाज सुरू होण्यासाठी प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा होणे गरजेचे होते. हीच बाब लक्षात घेऊन आमदार रोहित पवार यांनी पुढाकार घेतला. बुधवारी मंत्रालयात विधी व न्याय विभागाचे सचिव दिलीप घुमरे आणि सहसचिव गायकवाड यांच्यासोबत ही महत्त्वाची बैठक पार पडली.

## श्रीगोंदा शुगर शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)




जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, श्रीगोंदा शुगर येथे मंगळवार, दि. ७ एप्रिल २०२६ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. कार्यक्रमाचे उद्घाटन सहकारमहर्षी नागवडे साखर कारखान्याचे संचालक श्री. विठ्ठलराव जंगले, लिंपणगावच्या सरपंच शोभाताई कोकाटे, ग्रामपंचायत सदस्य डॉ. दत्तात्रय गायकवाड, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीप कोकाटे, युवा उद्योजक सुरेश पवार, माजी प्राचार्य रंगनाथ राजापुरे सर, जिजाबाई कापरे तसेच उपस्थित पालकांच्या हस्ते करण्यात आले. शाळेत विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम नियमित राबवले जात असून, यंदाचे स्नेहसंमेलनही मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. विद्यार्थ्यांनी गणपती गीत, शेतकरी गीत, कोळीगीत, भक्तीगीत आणि लावणी अशा विविध गाण्यांवर बहारदार नृत्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. या कार्यक्रमास माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष मधुकर काळाणे, काकासाहेब दातीर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. श्रीगोंदा फॅक्टरी परिसरातील पालक, ग्रामस्थ आणि तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. तसेच मढेवडगाव केंद्राचे केंद्रप्रमुख भुकन व तालुक्यातील इतर शिक्षकांनीही कार्यक्रमाला उपस्थिती लावली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका श्रीमती पद्मा शिर्के (पाचपुते मॅडम) यांच्यासह गायकवाड, जरांडे, खिळे, पाचांगणे व पऱ्हे मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले. वरिष्ठ अधिकारी आशुतोष पाचपुते हे संपूर्ण कार्यक्रमाला उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन जंगलेवाडीचे उपक्रमशील शिक्षक नाना रसाळ सर व संदीप हिरवे सर यांनी केले. यावेळी ॲड. अशोकराव रोडे, सुनील जंगले, लहानु जंगले, संदीप जाधव, तसलीम शेख, दीपक दांडगे, अजय घोडके, आदिनाथ पाचपुते सर, शेलार सर तसेच मोठ्या प्रमाणावर माता-भगिनी उपस्थित होत्या. लिंपणगाव केंद्राच्या केंद्रप्रमुख श्रीमती जामदार मॅडम, काष्टी बीटचे ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी निळकंठ बोरुडे व श्रीगोंदा पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी कुसुमकुमारी कानडी मॅडम यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.

## नागवडे इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शैक्षणिक वर्षाचे स्वागत

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)



श्रीगोंदा तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या शिवाजीराव नागवडे डॅफोडील्स स्कूलमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात आनंदी व उत्साही वातावरणात करण्यात आली. शाळेच्या पहिल्याच दिवशी प्रवेशद्वारावर विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

शाळेच्या परिसरात आकर्षक सजावट करण्यात आली होती. रांगोळी, प्रेरणादायी संदेशफलक, शैक्षणिक माहिती आणि सेल्फी स्टँड यांसारख्या नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचे स्वागत विशेष ठरले. शिक्षकांनी हसतमुखाने विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना नवीन अभ्यासक्रम, शालेय उपक्रम आणि विविध कार्यक्रमांची माहिती दिली. या स्वागतामुळे विद्यार्थ्यांचा पहिला दिवस आनंददायी ठरल्याचे मत पालकांनी व्यक्त केले. यावेळी मुख्याध्यापिका नीतू दुलांनी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, “नवीन शैक्षणिक वर्ष म्हणजे नवी संधी, नवी स्वप्ने आणि नवीन ध्येय गाठण्याची सुरुवात आहे. विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास, शिस्त आणि सकारात्मक दृष्टीकोन ठेवून शिक्षण घ्यावे, तसेच कला, क्रीडा आणि इतर उपक्रमांमध्येही सक्रिय सहभाग नोंदवावा.” विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विज्ञान-गणित प्रदर्शन, क्रीडा स्पर्धा आणि वर्षभर विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. शाळेत आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जात असून, अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन आणि नाविन्यपूर्ण शिक्षणपद्धतीमुळे १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखण्यात आली आहे.

तसेच डिजिटल युगाचा विचार करून यावर्षीपासून आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार असून, विद्यार्थ्यांसाठी डिजिटल पॅनल बोर्डची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे निरीक्षक एस. पी. गोलांडे यांनी सांगितले.

सुट्टीनंतर शाळा पुन्हा एकदा विद्यार्थ्यांच्या हास्याने आणि उत्साहाने गजबजून गेली. नवीन वर्गात प्रवेश करण्याची उत्सुकता, जुन्या व नवीन मित्र-मैत्रिणींना भेटण्याचा आनंद आणि नव्या गोष्टी शिकण्याची जिज्ञासा विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसून येत होती.

यावेळी तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे व विश्वस्त अनुराधाताई नागवडे यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या.

## खर्डी ग्रामपंचायतीमधील रस्त्यावर खड्डेच खड्डे

खर्डी : (स. गांवकरी)

खर्डी ग्रामपंचायतील रस्त्यांवर खड्डेच खड्डे पडले असून प्रशासनाने तातडीने दुरुस्ती करावी अशी ग्रामस्थांची मागणी होत आहे. शहापूर तालुक्यातील खर्डी गावात दरवर्षीप्रमाणे यंदाही सोनाई सीताई देवीची यात्रा ( बोहाडा) दि.१४ एप्रिल पासून सुरू होणार असून गावात यात्रेची जोरात तयारी सुरू झाली आहे. तसेच भारतीय घटनेचे शिल्पकार भारत रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा १४,एप्रिल रोजी जयंती उत्सव साजरा होत आहे. मात्र खड्ड्यांमुळे गावातील रस्त्यांची दुरावस्था झाली असून जयंती मिरवणुकीत अडथळा येऊ शकतो. यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

गावातील अनेक ठिकाणी मोठ मोठे खड्डे पडले असून सध्या वाहनचालक तसेच पादचारी यांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे.तसेच देवीच्या यात्रेदरम्यान भाविकांची गर्दी होत असल्याने रस्त्याच्या दोन्ही बाजूस मोटरसायकल व चार चाकी गाड्या अवैध रित्या पार्किंग होत असल्याने समस्या अधिक गंभीर होऊ शकते.

या समस्येबाबत ग्रामस्थांनी पत्रकारांसमोर आपली ठाम भूमिका मांडत खर्डी ग्रामपंचायतीचे लक्ष वेधले आहे. “यात्रा सुरू होण्यापूर्वी रस्त्यांवरील खड्डे बुजवणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा ग्रामस्थ व भाविकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागेल,” असे ग्रामस्थानी स्पष्टपणे सांगितले.

खर्डी ग्रामपंचायतीने या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देत रस्त्यांची दुरुस्ती करावी, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे. प्रशासनाने वेळेत पावले उचलली नाहीत तर नागरिकांच्या संतापाचा उद्रेक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# तलवाडा गावाच्या शिरपेचात ज्ञानेश्वरी पवारने रोवला मानाचा तुरा

## लोकसेवा आयोगाच्या परिक्षेत कर सहायक व महसूल सहायक पदावर निवड

वैजापूर : (स. गांवकरी)



> मुलगा आणि मुलगी असा भेदभाव न करता माझ्या वडीलांनी मला माझ्या प्रशासकिय अधिकारी होण्याच्या स्वप्नांना जे बळ दिले त्यामुळेच मी यश संपादन करु शकले. माझ्या कुटुंबियांनी वेळोवेळी प्रोत्साहित केले. त्यामुळे अखंडपणे अभ्यास केला माझ्या यशात त्यांचाही आणि मार्गदर्शक, गुरुजन या सर्वांचा मोलाचा वाटा आहे. प्रत्येक वडीलांनी आणि कुटुंबांनी मुलीच्या बाबतीत अशीच भावना ठेवणे गरजेचे आहे मुलींना प्रत्येक क्षेत्रात पुढे जाण्यास सहकार्य करावे.
> - ज्ञानेश्वरी पवार

तलवाडा (ता. वैजापुर) येथील ज्ञानेश्वरी नामदेव पवार हिने जिद्द , आणि चिकाटीच्या जोरावर लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या २०२४ च्या परिक्षेत एनटी-क प्रवर्गातुन महाराष्ट्रात प्रथम येत घवघवीत यश संपादन करत कर सहायक व महसुल सहायक या पदावर निवड झाल्याने तलवाडा गावासह संपूर्ण तालुक्यातून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. ज्ञानेश्वरीचे प्राथमिक शिक्षण तलवाडा येथील जिल्हा परिषद प्रशालेत झाले, माध्यमिक शिक्षण न्यू हायस्कूलमध्ये तर उच्च माध्यमिक शिक्षण नांदगांव येथे पूर्ण केले. पदवीचे शिक्षण आंबेलोहळ व छत्रपती संभाजीनगर येथे पूर्ण झाले. ज्ञानेश्वरीने इयत्ता दहावीला न्यू हायस्कूलमध्ये ९३%. गुण मिळवून प्रथम येण्याचा मान मिळविला होता. त्यावेळी दैनिक समर्थ गांवकरी व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्यावतीने आयोजित गुणगौरव सोहळ्यात प्रशासकिय अधिकाऱ्यांच्या हस्ते संत्कार करण्यात आला होता. त्याचवेळी उपस्थित मान्यवरांच्या मार्गदर्शनपर भाषणाचा चांगलाच प्रभाव तिच्यावर पडला होता आणि तेव्हापासूनच आपणही काहीतरी केले पाहिजे या ध्येयाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेसाठी तयारी करण्याचा निश्चय केला. आजोबा विठ्ठल पवार व चुलते ह .भ.प. पुरुषोत्तम पवार हे सुरुवातीपासूनच धार्मिक वृत्तीचे आहेत. वडील नामदेव पवार हे शेतकरी तर चुलते किराणा दुकान चालवतात, एक सर्वसामान्य कुटुंबातील ज्ञानेश्वरीच्या घरात कोणीही शासकिय नोकरीत नसतांना कुटुंबीयांनी तिच्या शिक्षणाला प्राधान्य देत उराशी बाळगलेल्या स्वप्नांना बळ दिले.आणि छत्रपती संभाजीनगर येथील रिलायबल सार्धा परिक्षा केंद्रात अभ्यासाला सुरुवात केली: आर्थिक अडचणींचा सामना करत काटकसरीचे जीवन जगत डोळ्यासमोर असलेले ध्येय साध्य करण्यासाठी येणाऱ्या समस्यांकडे दुर्लक्ष करत केवळ सराव करण्याकडे अधिक लक्ष केंद्रीत केले. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परिक्षेत अथक परिश्रम,जिद्द व चिकाटीमुळे मिळालेले यश हे केवळ पवार कुटुंबियासाठी अभिमानाची बाब नाही तर संपूर्ण तलवाडा गावासाठी अभिमानाची बाब आहे. ज्ञानेश्वरीने मिळविलेले यश हे मुलींसाठी प्रेरणादायी संदेश देणारे आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### माध्यम प्रमुखपदी गोविंद येतयेकर तर सह माध्यम प्रमुखपदी ओम प्रकाश चौहान

मुंबई (स. गांवकरी) : भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश च्या माध्यम प्रमुख पदी श्रीगोविंद येतयेकर यांची तर सह माध्यम प्रमुख पदी ओम प्रकाश चौहान यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत श्री गोविंद येतयेकर व श्री ओम प्रकाश चौहान यांना संघटनात्मक नियुक्तीचे पत्र देण्यात आले. यावेळी रविंद्र चव्हाण यांनी त्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी भाजपचे सरचिटणीस राजेश पांडे, सरचिटणीस सुनील राणी भारतीय जनता युवा मोर्चाचे अध्यक्ष कृष्णराज महाडिक आदी मान्यवर उपस्थित होते. गोविंद येतयेकर हे एक पत्रकार आणि महाराष्ट्रातील भारतीय जनता पक्षाचे प्रमुख पदाधिकारी आहेत. यापूर्वी प्रबोधन गोरेगावच्या कार्यकारिणीत देखील सक्रिय होते. पत्रकार आणि सामाजिक क्षेत्रात कार्य आहे. ओमप्रकाश चौहान हे भाजपाचे जुने कार्यकर्ते असून माध्यम विभागात अनेक वर्षापासून कार्यरत आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली भाजपची माध्यम व्यवस्था अधिक मजबूत करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत होत आहे.

### ठाणे जिल्हा परिषदेच्या शाळेतील तनय व विदिशाची 'इस्त्रो' कडे झेप



ठाणे (स. गांवकरी) : ठाणे जिल्हा परिषदेच्या शाळेतील तनय आणि विदिशाने मिशन भरारी' अंतर्गत उपक्रमाद्वारे 'इस्त्रो' कडे झेप घेतली आहे. ग्रामीण भागातील गुणवत्ता आणि जिद्दीच्या जोरावर जिल्हा परिषद शाळा, वसार (ता. अंबरनाथ) येथील विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा आपल्या कर्तृत्वाचा डंका वाजवला आहे. मिशन भरारी या उपक्रमांतर्गत भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजेच इस्त्रो (ISRO) या जागतिक कीर्तीच्या संस्थेला भेट देण्यासाठी शाळेतील इयत्ता आठवीचे दोन विद्यार्थी कु. तनय एकनाथ वायले आणि कु. विदिशा अरुण वायले यांची निवड झाली आहे. जिल्हा परिषद शाळांच्या विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवण्यासाठी राबवण्यात येणाऱ्या 'मिशन भरारी' अंतर्गत ही निवड चाचणी घेण्यात आली होती. अत्यंत कठीण स्पर्धा आणि अवघड टप्प्यातून तावून-सुलाखून निघत तनय आणि विदिशा यांनी आपले स्थान निश्चित केले आहे. वसार गावातील हे पहिलेच विद्यार्थी आहेत जे थेट इस्त्रोच्या केंद्राला भेट देऊन अंतराळ विज्ञानाचे धडे गिरवणार आहेत. या निवडीमुळे वसार गावात आनंदाचे वातावरण पसरले आहे. पोतेकर (गटशिक्षणाधिकारी) जतकरसर (विस्तार अधिकारी) शिद सर (विस्तार अधिकारी) पाटील मॅडम (शापो. अधिकारी ) यांचेही विशेष मार्गदर्शन लाभले आहे. शाळेच्या केंद्र प्रमुख तथा मुख्याध्यापिका सौ. बागुल मॅडम , मार्गदर्शक शिक्षक, वर्गशिक्षक खंबायत सर व ज्यांनी विद्यार्थ्यांना या स्पर्धेसाठी तयार केले, तसेच Asb कंपनीचे ही विशेष सहकार्य लाभले.त्यांच्या कौशल्याचे विशेष कौतुक होत आहे. तसेच, मुलांच्या यशात मोलाचा वाटा असणाऱ्या पालकांचेही सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.




### वजनात फसवणूक करून व अवैध कट्टी वसूल करून लूट थांबवावी

बिलोली (स. गांवकरी) : बिलोली तालुक्यात शासनाच्यावतीने सुरू असलेल्या सोयाबीन खरेदी केंद्रांवर शेतकऱ्यांची सर्रास आर्थिक लूट होत आहे. शासनाने ठरवून दिलेल्या नियमांनुसार शासन काटा ५० किलो ७०० ग्रॅम असा असताना, प्रत्यक्षात मात्र खरेदी केंद्रांवर ५१ किलो २०० ग्रॅम वजन घेण्यात येत आहे. ही थेट वजनात फसवणूक असून शासन नियमांच्या पूर्णतः विरोधात आहे. तसेच खरेदीच्या वेळी खालीलप्रमाणे बेकायदेशीर कट्टी काढली जात आहे, माती असल्याचे कारण देत ३ किलो कपात खराब सोयाबीनच्या नावाखाली २ किलो कपात क्विंटलमागे सरसकट अडीच किलो वेगळी कट्टी अशाप्रकारे एका क्विंटलमागे ७ ते ८ किलोपर्यंत सोयाबीन कमी मोजले जात असून, हा प्रकार शेतकऱ्यांच्या घामाच्या कष्टावर उघड अन्याय करणारा आहे. याशिवाय, शासनाने निश्चित केलेल्या हमाली दरांपेक्षा जास्त प्रमाणात प्रति क्विंटल ५० रुपयांपासून ८० रुपयांपर्यंत हमाली आकारली जात आहे.





# शंभर टक्के कर्जवसुली करणाऱ्या संस्थांचा सन्मान







अकोले : (स. गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने उत्कृष्ट कर्जवसुली करणाऱ्या संस्थांचा विशेष सन्मान करण्यात आला. सभासद पातळीवरील वसुलीत हिवरगाव आंबरे सोसायटीने

**हिवरगाव आंबरे सोसायटी प्रथम!**

प्रथम क्रमांक पटकावला, तर बँक पातळीवर डोंगरगाव, अंबड, कळस खुर्द, बहीरवाडी, म्हाळदेवी, निंब्रळ व रुंभोडी या संस्थांनी शंभर टक्के वसुली करून उल्लेखनीय कामगिरी केली. या प्रसंगी संबंधित संस्थांच्या सचिवांचा विशेष सत्कार करून त्यांच्या कार्याचे कौतुक करण्यात आले. नियमित कर्जफेड, सभासदांशी सातत्यपूर्ण संपर्क आणि शिस्तबद्ध आर्थिक नियोजन यामुळे या संस्थांना शंभर टक्के वसुली साध्य करता आल्याचे सांगण्यात आले. कार्यक्रमात उपनिबंधक अधिकारी अमोल वाघमारे यांनी मार्गदर्शन करताना सहकार क्षेत्र मजबूत करण्यासाठी वेळेवर कर्जफेड आवश्यक असल्याचे नमूद केले. तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गावकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सचिवांचे अभिनंदन करून इतर संस्थांनीही यापासून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले. तालुका विकास अधिकारी भारत वाकचौरे, वसुली अधिकारी प्रवीण शेळके आणि कार्यालय अधीक्षक शिवराम भांडकोळी यांच्या हस्ते सचिवांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात उपस्थितांनी शंभर टक्के वसुली करणाऱ्या संस्थांचे अभिनंदन करत भविष्यातही अशीच कामगिरी कायम ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

## जिल्हा परिषद शाळांना सोलर प्लांटचे लोकार्पण



जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हिवरे खुर्द येथे मंगळवार दिनांक ७ एप्रिल २०२६ रोजी दुपारी २ वाजता क्लीन एनर्जी एक्सेस प्रोग्रॅम अंतर्गत ऍपटीव्ह कंपोनेंटस इंडिया प्रायव्हेट लिमि व आय.आय.ई.सी.यांच्या वतीने " सोलर प्लांट लोकार्पण सोहळा "चे उदघाटन एपप्टिव्ह कंपनी चे अधिकारी संकेत जाधव,सागर वाव्हळ व आय.आय. ई. सी. चे सिनियर अधिकारी अमर यादव, सिनियर प्रोग्राम मॅनेजर अनंत जोशी, अधिकारी जायनवाट मनीष सेहरावत, समन्वयक तुषार बिनवडे,अंकुश कोकणे मान्यवर पदाधिकारी यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आय.आय.ई.सी. चे प्रमुख अधिकारी अमर नाथ यादव होते.जुन्नर तालुक्यातील हिवरे खुर्द,पाडळी,चिंचोली मराठी, घाटघर,सितेवाडी,करंजाळे या शाळांना सोलर प्लांट देण्यात आले.विजेची सोय व्हावी म्हणून हा प्रकल्प भविष्यात शाळांना उपयुक्त ठरेल.त्यामुळे संगणक कक्ष असेल तर विजेच्या संबंधित सोयी सुविधा असतील तर निश्चित त्यासाठी सोलर चा फायदा होईल.असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

## जिल्हा बँकेच्या ठेवी ११,३११ कोटी; मार्च अखेर ३४.४७ टक्के कर्जवसुली!

### सोनेतारण कर्जाला मोठा प्रतिसाद; सीडी रेशो ६८.२२ टक्के – चेअरमन चंद्रशेखर घुले पाटील

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर ठेवीदारांचा वाढता विश्वास दिसून येत असून मार्च २०२६ अखेर बँकेकडे तब्बल ११,३११ कोटी रुपयांच्या ठेवी जमा झाल्या आहेत. बँकेच्या इतिहासात प्रथमच ठेवींचा इतका मोठा टप्पा पार करण्यात आला आहे. ठेवीदार ग्राहकांनी बँकेवर दाखविलेल्या विश्वासाबद्दल चेअरमन चंद्रशेखर घुले पाटील यांनी आभार व्यक्त केले. अडचणीच्या काळातही जिल्ह्यातील शेतकरी सभासदांनी वेळेत कर्जफेड केल्यामुळे मार्च अखेर बँकेची कर्जवसुली ३४.४७ टक्क्यांपर्यंत पोहोचली असल्याची माहिती त्यांनी दिली. जिल्ह्यातील ठेवीदारांनी आपल्या अमूल्य बचतीची गुंतवणूक जिल्हा बँकेत करून बँकेवर विश्वास दाखविला आहे. बँक ठेवीदारांना आकर्षक व्याजदर, जलद सेवा तसेच आधुनिक डिजिटल सुविधा देत असल्यामुळे ग्राहकांचा प्रतिसाद वाढत आहे. बँक डिजिटल सेवेमध्ये राज्यात आघाडीवर असून मोबाईल बँकिंग, ऑनलाइन व्यवहार, जलद कर्ज प्रक्रिया यामुळे ग्राहकांना मोठी सोय झाली आहे. बँकेने गेल्या चार महिन्यांपासून सोनेतारण कर्जासाठी विशेष उपक्रम राबविला आहे. या अंतर्गत शेतकरी व सर्वसामान्य ग्राहकांना ८ टक्के व्याजदराने प्रति व्यक्ती ५ लाख रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध करून दिले जात आहे. या योजनेला मोठा प्रतिसाद मिळत असून मार्च २०२६ अखेर सोनेतारण कर्जाचे एकूण वितरण १४६ कोटी रुपयांपर्यंत पोहोचले आहे. सध्या बँकेच्या ११८ शाखांमध्ये ही सेवा उपलब्ध असून लवकरच १६० शाखांमध्ये सोनेतारण कर्ज सुविधा सुरू करण्यात येणार असल्याचे घुले पाटील यांनी सांगितले.

रिझर्व्ह बँकेच्या निकषांनुसार जिल्हा बँकेचा सीडी रेशो ६८.२२ टक्के असून हा रेशो बँकिंग क्षेत्रात आदर्श मानला जातो. यामुळे ठेवींच्या तुलनेत कर्ज वितरण योग्य प्रमाणात होत असल्याचे स्पष्ट होत असून बँकेची आर्थिक स्थिती सक्षम असल्याचे त्यांनी नमूद केले. याप्रसंगी व्हाईस चेअरमन ॲड. माधवराव कानवडे यांनी सांगितले की, चालू सहकार वर्षात वसुलीस पात्र असलेली रक्कम ५८३४ कोटी रुपये होती. त्यापैकी मार्च २०२६ अखेर २०११ कोटी रुपयांची वसुली झाली आहे. यामध्ये १८६३ कोटी रुपयांची पिक कर्ज वसुली असून शेतकरी सभासदांनी सेवा सोसायट्यांमार्फत मोठ्या प्रमाणावर कर्जफेड केली आहे. यामुळे सहकारी संस्थांपुढील आर्थिक अडचणी काही प्रमाणात कमी झाल्या आहेत. शेतकरी सभासद, सेवा संस्थांचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, पंचकमिटी सदस्य, सचिव तसेच बँकेचे अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले. जिल्हा बँकेच्या ठेवीत झालेली वाढ, कर्जवसुलीतील सुधारणा, सोनेतारण कर्जाला मिळालेला प्रतिसाद आणि डिजिटल सेवांचा विस्तार यामुळे बँकेची आर्थिक घोडदौड सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे.

सहकार क्षेत्रातील जिल्हा बँक अधिक सक्षम करण्यासाठी संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी एकत्रितपणे काम करत असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रावसाहेब वर्पे यांनी सांगितले की, संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील विविध विकास सेवा संस्थांचे पदाधिकारी, सचिव तसेच बँक कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. शेतकरी बांधवांना कर्जफेड सुलभ व्हावी यासाठी अनेक शाखांमध्ये सुट्टीच्या दिवशीही कामकाज सुरू ठेवण्यात आले. कर्ज भरण्यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला. शेतकऱ्यांनी दाखविलेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे आगामी हंगामात मोठ्या प्रमाणावर पिक कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## बहिर्जी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक क्षेत्रभेट

वसमत : (समर्थ गांवकरी)



वसमत येथील मुख्याध्यापक प्रवीण शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली बहिर्जी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक उपक्रमांतर्गत वसमत तहसील कार्यालयाला क्षेत्रभेट देत शासकीय प्रशासनाची कार्यपद्धती प्रत्यक्ष अनुभवली. विद्यार्थ्यांना पुस्तकांतील ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष शासकीय कामकाजाची ओळख व्हावी, या उद्देशाने ही भेट आयोजित करण्यात आली होती. या क्षेत्रभेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी तहसील कार्यालयातील विविध विभागांना भेट देऊन महसूल प्रशासनाची सविस्तर माहिती घेतली. तलाठी, मंडळ अधिकारी, लिपिक वर्ग तसेच इतर कर्मचाऱ्यांचे दैनंदिन कामकाज कसे चालते, याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. जमीन नोंदी, सातबारा उतारे, जात, उत्पन्न व निवासी दाखले, निवडणूक प्रक्रिया, आपत्ती व्यवस्थापन, तसेच नागरिकांच्या तक्रारींचे निवारण या विषयांवर अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले. तहसील कार्यालयातील अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शासकीय सेवांचे महत्त्व, प्रशासनातील पारदर्शकता आणि जबाबदाऱ्या याबाबत सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनीही उत्सुकतेने विविध प्रश्न विचारत प्रशासनाच्या कामकाजाबाबत आपली जिज्ञासा व्यक्त केली. अनेक विद्यार्थ्यांनी भविष्यात प्रशासन क्षेत्रात करिअर करण्याची इच्छा व्यक्त केली.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना कार्यालयीन प्रक्रिया, कागदपत्रांची पूर्तता, अर्ज सादरीकरणाची पद्धत, तसेच नागरिकांना मिळणाऱ्या विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. तसेच डिजिटल सेवांचा वापर, ऑनलाईन अर्ज प्रक्रिया आणि ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून नागरिकांना मिळणाऱ्या सुविधांबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. शाळेच्या शिक्षकांनी सांगितले की, अशा प्रकारच्या क्षेत्रभेटीमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो, त्यांच्या ज्ञानात भर पडते आणि प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण अधिक प्रभावी होते. विद्यार्थ्यांनीही ही भेट अत्यंत उपयुक्त व माहितीपूर्ण ठरल्याची प्रतिक्रिया दिली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रशासनाची जवळून ओळख झाली असून, समाजातील विविध घटकांसाठी शासकीय यंत्रणा कशा प्रकारे कार्य करते, याची स्पष्ट जाणीव झाली आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये जबाबदार नागरिकत्वाची भावना निर्माण होण्यास मदत होत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण तथा सक्षम प्राधिकारी यांचे समक्ष**
महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत त्यास बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत अधिनियम १९६३ याच्या कलम ११ अन्वये नोटीस.
दुरध्वनी : ०२०–२६१२५७७९ ईमेल: ddrpunegramingmail.com
मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक, १०७/२०२५–२६ पुणे, दिनांक: ०६/०४/२०२६
स्वप्नशिल्प रेसिडेन्सी (ए बी विंग) को–ऑप. हौसिंग सोसायटी लि. पत्ता– रा. शेटेमळा, नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे. ४१०५०४.........**अर्जदार**
तर्फे खजिनदार श्री. आनंद सोनू गाडगे
**विरुद्ध**.......मे. निर्मिती बिल्डर्स अँड डेव्हलपर्स तर्फे प्रोप्रा. १) श्री. राजेश दिनकर कोल्हे (विकसक),२) श्री. मारुती बाबु खैरे (जागा मालक) ३) श्री. मच्छिंद्र जनाजी खैरे (जागा मालक), ४) श्रीमती. हिराबाई किसन खैरे (जागा मालक),
५) श्री. सुशांत किसन खैरे (जागा मालक), ६) श्री. वैभव किसन खैरे (जागा मालक), ७) श्रीमती, मालती वसंत खैरे (जागा मालक), ८) श्री. अनिल वसंत खैरे (जागा मालक), ९) श्रीमती. अरुणा मंगेश तेंडोलकर (जागा मालक), १०) श्रीमती. शीला रविंद्र खैरे (जागा मालक), ११) श्री. अभिषेक रविंद्र खैरे (जागा मालक), १२) श्री. सुरज रविंद्र खैरे (जागा मालक), वरील १ ते १२ सर्व रा. शेटेमळा, नारायणगाव, ता. जुन्नर, पुणे. ४१०५०४............. **जाबदेणार**
वरील अर्जदारांनी महाराष्ट्र फ्लॅट ओनरशिप ॲक्ट (मोफा) १९६३ चे कलम ११ अंतर्गत संस्थेच्या मिळकतीचे मानीव अभिहस्तांतरण होणेसाठी प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सबब वरील जाब देणार यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर संस्थेच्या अभिहस्तांतरणाबाबत त्यांचे काही म्हणणे/हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात दिनांक २०/४/२०२६ रोजी दुपारी ४.०० वा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, ५. बी. जे. रोड, पुणे ४११००१ येथे उपस्थित रहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहील्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन पुढील निर्णय घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.
सदरची नोटीस आज दिनांक ०६/०४/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे.
(प्रकाश ल. जगताप)
सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे, (ग्रामीण)

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण तथा सक्षम प्राधिकारी यांचे समक्ष**
महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत त्यास बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत अधिनियम १९६३ याच्या कलम ११ अन्वये नोटीस.
दुरध्वनी : ०२०–२६१२५७७९ ईमेल: ddrpunegramingmail.com
मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक, १०७/२०२५–२६ पुणे, दिनांक: ०६/०४/२०२६
सूर्योदय रेसिडेन्सी सहकारी गृहरचना संस्था मर्या. तर्फे श्री. प्रविण बन्सी मोढवे (अध्यक्ष) रा. सूर्योदय रेसिडेन्सी सहकारी गृहरचना संस्था मर्या. सि.स.नं. ७२३ ते ७२६, रविवारपेठ, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे. ४१०५०२ .........**अर्जदार**
**विरुद्ध**....... १) श्री. बंडू सदाशिव कर्पे (विकासक/जागा मालक)
२) श्री. मिलिंद राजाराम झगडे (विकासक/जागा मालक)
सर्व रा. कल्याणपेठ, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे. ४१०५०२.......... **जाबदेणार**
वरील अर्जदारांनी महाराष्ट्र फ्लॅट ओनरशिप ॲक्ट (मोफा) १९६३ चे कलम ११ अंतर्गत संस्थेच्या मिळकतीचे मानीव अभिहस्तांतरण होणेसाठी प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सबब वरील जाब देणार यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर संस्थेच्या अभिहस्तांतरणाबाबत त्यांचे काही म्हणणे/हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात दिनांक २०/४/२०२६ रोजी दुपारी ४.०० वा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, ५, बी. जे. रोड, पुणे ४११००१ येथे उपस्थित रहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहील्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन पुढील निर्णय घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.
सदरची नोटीस आज दिनांक ०६/०४/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे.
(प्रकाश ल. जगताप)
सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे, (ग्रामीण)

# ‘कॉम्प्रिहेन्सिव्ह हर्निया सर्जिकल मंथ’ उपक्रमास सुरुवात

## विशेष हर्निया पॅकेजचेही लोकार्पण

नाशिक : (स. गांवकरी)

अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिक येथे हर्निया या सामान्य पण अनेकदा दुर्लक्षित राहणाऱ्या आजाराबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी ‘कॉम्प्रिहेन्सिव्ह हर्निया सर्जिकल मंथ’ या विशेष उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमाची माहिती देण्यासाठी हॉस्पिटलतर्फे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमाचे नेतृत्व वरिष्ठ GI सर्जन डॉ. संदीप सबनीस करत असून, त्यांच्या सर्जिकल टीममध्ये डॉ. प्रखर गुप्ता, डॉ. उर्विक पाटील तसेच संपूर्ण GI सर्जरी टीम सहभागी आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून हर्नियाचे लवकर निदान, आधुनिक उपचारपद्धती आणि सुरक्षित शस्त्रक्रिया याबाबत रुग्णांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

हर्निया हा पोटाच्या स्नायूंमध्ये निर्माण झालेल्या कमकुवत भागामुळे होणारा आजार असून, वेळेवर उपचार न केल्यास तो गंभीर होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर या विशेष महिन्यात रुग्णांना तज्ज्ञ सल्लामसलत, तपासण्या आणि अत्याधुनिक लॅप्रोस्कोपिक शस्त्रक्रिया पर्याय उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.




याच निमित्ताने रुग्णांना परवडणाऱ्या दरात गुणवत्तापूर्ण सेवा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष हर्निया केअर पॅकेज देखील सुरू करण्यात येत आहे. या पॅकेजअंतर्गत तज्ज्ञ सल्लामसलत व USG (अल्ट्रासोनोग्राफी) तपासणी अवघ्या ₹४९९ मध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहे, ज्यामुळे रुग्णांना हर्नियाचे लवकर निदान करणे अधिक सुलभ होणार आहे. तसेच, या उपक्रमांतर्गत हर्नियाची कोणतीही शस्त्रक्रिया जास्तीत जास्त ₹१,००,००० पर्यंत परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याबाबत बोलताना वरिष्ठ GI सर्जन डॉ. संदीप सबनीस म्हणाले, “हर्निया हा उपचारक्षम आजार आहे, परंतु अनेक वेळा रुग्ण उशिरा येतात. लवकर निदान आणि योग्य शस्त्रक्रिया केल्यास रुग्ण पूर्णपणे बरा होऊ शकतो. या उपक्रमाच्या माध्यमातून आम्ही रुग्णांना जागरूक करणे आणि त्यांना परवडणाऱ्या दरात अत्याधुनिक उपचार उपलब्ध करून देणे हे आमचे उद्दिष्ट आहे.”

यावेळी हॉस्पिटलचे केंद्र प्रमुख श्री. अनुप त्रिपाठी यांनी सांगितले की, “रुग्णांना तज्ज्ञ सेवा आणि आधुनिक उपचार परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देणे ही आमची प्राथमिकता आहे. ‘कॉम्प्रिहेन्सिव्ह हर्निया सर्जिकल मंथ’ आणि विशेष पॅकेजच्या माध्यमातून अधिकाधिक रुग्णांना वेळेवर निदान व उपचार मिळतील, असा आम्हाला विश्वास आहे. अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये आम्ही नेहमीच रुग्ण-केंद्रित आणि गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी कटिबद्ध आहोत.”

अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिक येथे आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम हर्नियाबाबत जागरूकता वाढवण्यासोबतच रुग्णांना योग्य वेळी निदान आणि प्रभावी उपचार मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# डॉ. विखे पाटील अभियांत्रिकीत प्रथमवर्ष विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ



अहिल्यानगर : (स. गांवकरी)

विळद घाट येथील येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रथमवर्षातील विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय यशाचा गौरव करण्यासाठी त्यांचे स्वागत करून सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास फाउंडेशनचे तांत्रिक संचालक श्री. सुनील कल्हापूरे, प्राचार्य डॉ. रवींद्र नवथर, विभागप्रमुख डॉ.सतीश मरकड सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाद्वारे घेण्यात आलेल्या परीक्षेत सर्व विषय उत्तीर्ण होऊन विशेष प्रावीण्यासह प्रथमश्रेणी मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी श्री. कल्हापूरे यांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे, सातत्याचे आणि जिद्दीचे कौतुक करताना सांगितले की, " ही केवळ सुरुवात आहे. सुरुवात चांगली झाली तर पुढील वाटचाल नक्कीच यशस्वी होते." त्यांनी विद्यार्थ्यांना पुढेही सातत्याने परिश्रम करण्याचा सल्ला देत शुभेच्छा दिल्या. प्राचार्य डॉ. नवथर यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन करून भविष्यातही असेच यश मिळेल.असा विश्वास व्यक्त केला. विभागप्रमुख डॉ. मरकड यांनी सांगितले की, "हे यश विद्यार्थ्यांच्या कष्टांचे आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे फलित आहे." तसेच व्यवस्थापनाने उपलब्ध करून दिलेल्या सुविधा व विद्यार्थ्यांसाठी राबवलेल्या उपक्रमांचे त्यांनी विशेष कौतुक केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रथम वर्ष समन्वयक डॉ. संदीप उदावंत यांनी आभार मानताना सांगितले की, हा कार्यक्रम श्री. सुनील कल्हापूरे यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आला असून त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना सतत प्रेरणा मिळत आहे. या सत्कार सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवीन ऊर्जा व आत्मविश्वास निर्माण झाला असून त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला प्रेरणादायी दिशा मिळाल्याचे सांगितले. प्रथम वर्ष शैक्षणिक समन्वयक डॉ. उदावंत, डॉ.गणेश शिरसाट तसेच सर्व शिक्षक व कर्मचारी यांच्या अथक परिश्रमांमुळे हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.



ठाणे : ५ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या ठाणे जिल्हा पॉवरलिफ्टिंग स्पर्धेमध्ये दिवा शहरातील कु. सुशांत सोनू आगरे याने ६९ किलोग्रॅम वजनी गटामध्ये ५२० किलोग्रॅम वजन उचलून सुवर्ण पदक पटकावले तसेच ठाणे जिल्हाचा स्ट्राँगमॅन किताब पटकावले तरी दिव्यातील स्थानिक नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांनी त्याचा सत्कार करून पॉवरलिफ्टिंगसाठी पुढच्या स्पर्धेसाठी अत्यावश्यक खेळाच्या साहित्यासाठी (किट ) व आर्थिक सहकार्य करून एक मदतीचा हात दिला. प्रसंगी दिनेश भोईर, कोकण प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष पडयार आदी उपस्थित होते. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...



### गोपाळ वर्मा यांचा राज्य मैढ़ क्षत्रिय सोनार समाजाच्या वतीने सत्कार

अहिल्यानगर (स. गांवकरी) : श्री मैढ़ क्षत्रिय सोनार समाज अहिल्यानगर चे युवा मंच अध्यक्ष व भाजपा शहर जिला उपाध्यक्ष श्री गोपाल वर्मा यांच्या समाज कार्य उत्तम असल्याने तसेच मनपा निवडणुकीत उत्कृस्ट कार्य केल्याबद्दल श्री मैढ़ क्षत्रिय सोनार समाज महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष हरिषजी खजवाणिया व मंत्री मंडल यांनी त्यांचा विशेष सन्मान करून सत्कार केला. यावेळी राज्य सचिव भरत खजवानीया,उपाध्यक्ष अनिल कडेल,सहसचिव संदीप खजवानीया,खजिनदार राजकुमार अग्रोया , सहखजिनदार कमलकिशोर बदलीया सह महाराष्ट्रातून प्रतिनिधी तसेच श्री मैढ़ क्षत्रिय सोनार समाज अहिल्यानगर चे अध्यक्ष अध्यक्ष श्री श्री कीसनजी मिरांडे, श्री मदनलालजी मिरांडे, श्री कांतिलालजी जवडा, श्री ओमप्रकाश सहदेव,श्री भरत वर्मा, श्री अशोक धुप्पड, श्री कन्हैयालाल वर्मा, श्री गोपीकीसन वर्मा आदी उपस्थित होते. श्री मैढ़ क्षत्रिय सोनार समाज युवा मंच अध्यक्ष असलेले गोपाल वर्मा यांचे समाजासाठी कायम मोठे योगदान आहे तसेच भाजपमध्ये त्यांनी विविध पदे भूषवली आहे त्याची अजून पुढे प्रगती व्हावी अश्या शुभेछया यावेळी देण्यात आल्या. गोपाळ वर्मा यांनी २०१३ मधे नरेन्द्र मोदी आर्मी संघटना स्थापन करुन अध्यक्ष या पदावर राहुन अहिल्यानगर मधील सर्व कोलेज, सार्वजनिक ठिकाणी टेबल लावुन सदस्यता अभियान मोठ्या प्रमाणात राबवला व पंतप्रधान श्री नरेन्द्र मोदीजी यांच्या प्रथम पंतप्रधान पदाच्या उमेदवारी मिळाली यासाठी मागणी केली,त्यावेळी मोदीजी हे प्रथम अहिल्या नगरमधे सभेला आले असता श्री वर्मा यांनी प्रखर भाषण केले त्याची खूप चर्चा झाली होती. अल्पकालिक विस्तारक म्हणून प्रदेशाने त्यांना मध्य प्रदेश येथे १० दिवस पाठवले होते त्यांनी मेरा बुथ सबसे मजबूत व घर चलो अभियान अंतर्गत प्रचार करुन भाजपाचे तेथील उमेदवार निवडुन आणले, मन की बात सहसंयोजक, नमो एप सहसंयोजक, ५ वर्ष चिटणिस पदावर काम केले १५ वर्ष सतत् सक्रिय आहेत तसेच नुकत्याच मनपा निवडणुकीत त्यांनी चांगले काम केले तसेच मैढ़ क्षत्रिय सोनार समाजासाठी ते गेली अनेक वर्ष काम करत आहेत.


### सौ. वनिता मानकर यांना "छत्रपती शिवराय कर्तृत्व भुषण" पुरस्कार प्रदान

अहिल्यानगर (स. गांवकरी) : आई फाउंडेशन, रायगड (भारत) व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने स्वराज्यभूमी रायगड गौरव संमेलनात अहिल्यानगर येथील श्री जिव्हेश्वर महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ.वनिता गणेश मानकर यांना "छत्रपती शिवराय कर्तृत्व भुषण" पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. शाल श्रीफळ, स्मृती चिन्ह,सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते. याप्रसंगी कॅबिनेट मंत्री भरत शेठ गोगावले, प्रसिद्ध अभिनेते संतोष पाटील,प्रमुख उपस्थिती उदय वाघेरे,संमेलनाध्यक्ष रायगड येथील आई फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. विनोदराव मोरे,स्वागताध्यक्ष प्रा.डॉ.बी.एन.खरात,महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे रायगड अध्यक्ष राकेश खराडे,कोकण अध्यक्ष शैलैश पालकर, उद्योजक गणेश मानकर, रणरागिणी महिला फाउंडेशनचे अध्यक्षा रोहिणीताई पवार (अहिल्यानगर),संयोजन समितीचे सौ.श्वेता शिर्के (रायगड),राजश्री कोळी (अलिबाग), संदेश महाडिक (रायगड),प्रा.सोनाली जाधव (शिर्डी) आदी उपस्थित होते. सौ.वनिता मानकर यांनी श्री जिव्हेश्वर महिला मंडळाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण बचत गट या माध्यमातून व सामाजिक कार्यात नेहमी सहभाग घेऊन कार्य करत असून सौ.वनिता मानकर या रांगोळी व मेहंदी आर्टिस्ट असून त्यांनी आत्तापर्यंत १०० मुलींना शिक्षण देऊन त्यातून रोजगार उपलब्ध करून दिला आहे.

### बिलोली शहरात शिवसेना तर्फे सामाजिक बांधिलकीतून 'पाणपोई'चे लोकार्पण

बिलोली (स. गांवकरी) : वाढत्या उन्हाची तीव्रता आणि लाहीलाही करणाऱ्या उन्हापासून नागरिकांना दिलासा देण्यासाठी शिवसेना बिलोली शहराच्या वतीने एक स्तुत्य सामाजिक उपक्रम राबविण्यात आला आहे. शहरात येणाऱ्या प्रवाशांची आणि स्थानिकांची तहान भागवण्यासाठी भव्य 'पाणपोई'चे उद्‌घाटन नुकतेच मोठ्या उत्साहात संपन्न झाले. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शिवसेनेच्या जनसेवा धोरणानुसार, उन्हाळ्याचे दिवस लक्षात घेऊन हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. 'पाणी पाजणे हे सर्वात मोठे पुण्य' या भावनेतून बिलोली शिवसेनेने शहरात ही सोय उपलब्ध करून दिली आहे. या उद्‌घाटन प्रसंगी शिवसेनेचे (शिंदे गट) अनेक दिग्गज पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने उपजिल्हाप्रमुख व्यंकटराव पाटील खतगावकर तालुकाप्रमुख बाबाराव रोकडे माजी नगराध्यक्ष: विजय कुचनवार माजी नगर उपाध्यक्ष आनंद गुडामालवर यांच्यासह माजी नगरसेवक लक्ष्मण शेट्टीवार, देवान्ना तोडरोड, रमेश पवनकर, चंद्रकांत कुडके, साईनाथ हंगारगे, मुन्ना पोवाडे, सुरेश स्वामी, पिराजी गांडमोड, सुरेश शेट्टीवार, बबलू पाटवेकर, संजय कानूरे, सयालू अंगावर, अनिल मुडकर आदी पदाधिकारी व शिवसैनिकांनी या उपक्रमात सक्रीय सहभाग नोंदवला. कार्यक्रमादरम्यान बोलताना मान्यवरांनी सांगितले की, शिवसेना नेहमीच ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या ब्रीदवाक्यावर चालते.

# महिलांसाठी प्रेरणादायी कार्यक्रम; साड्या व साहित्याचे वाटप!





मुलुंड : (स. गांवकरी)

मुलुंड येथे श्री महालक्ष्मी महिला ग्रुप आणि धनलक्ष्मीबेन नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या वतीने ओखा हरण निमित्ताने सुंदर व प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात समाजसेवक श्री नानजीभाई ठक्कर ठाणावाला, नीताबेन जोशी, श्री रामजीभाई पटेल, श्री संतोषभाई, भावनाबेन तसेच गटातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. घाटकोपर येथील मीनाबेन आपल्या टीमसह कार्यक्रमास उपस्थित राहिल्या. कार्यक्रमादरम्यान नानजीभाई ठक्कर यांच्या तर्फे महिलांना साड्या, पिशव्या, नाश्ता आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. यामुळे उपस्थित महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी मार्गदर्शन करताना नानजीभाईंनी सांगितले की, अशा प्रकारचे सामाजिक कार्यक्रम यापूर्वीही आयोजित करण्यात आले असून महिलांनी अंधश्रद्धेपासून दूर राहणे आवश्यक आहे. आजकाल काही तथाकथित बाबांच्या माध्यमातून स्त्रियांची दिशाभूल केली जात असल्याचे त्यांनी नमूद केले. महिलांनी सावध राहून विवेकाने निर्णय घ्यावा आणि आपले घरच मंदिर बनवणे हाच सर्वोत्तम मार्ग असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, शिक्षण मुलांना सत्य, प्रामाणिकपणा आणि उत्तम नैतिक मूल्ये शिकवते. पालकांनी मुलांना अंधश्रद्धेकडे किंवा चुकीच्या मार्गाकडे वळू देऊ नये, असे आवाहनही त्यांनी केले. “शिक्षण हीच भविष्याची गुरुकिल्ली आहे. तुमचे घर हेच मंदिर बनवा; ईश्वर आपोआप तुमच्या घरी येईल, परंतु ज्ञानदान करणे मात्र तुमच्याच हाती आहे,” असे प्रेरणादायी उद्गार नानजीभाईंनी यावेळी व्यक्त केले.

# वकीलाने मागितली डॉक्टर तरूणीकडे दोन लाखांची खंडणी

अहिल्यानगर: (स. गांवकरी)

अहिल्यानगर येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात नोकरीसाठी अर्ज देण्यास आलेल्या एका डॉक्टर तरूणीचा पाठलाग करून, त्यांचे व त्यांच्या बहिणीचे खासगी व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत दोन लाख रूपयांची खंडणी मागितल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी पीडित डॉक्टर तरूणीच्या फिर्यादीवरून वकिलाविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात विनयभंग, खंडणीचा गुन्हा बुधवार (दि.८ एप्रिल) रोजी पहाटे दाखल करण्यात आला आहे. हर्षद चावला (पूर्ण नाव, पत्ता माहिती नाही) असे गुन्हा दाखल झालेल्या संशयिताचे नाव आहे. दरम्यान, गुन्हा दाखल होताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. पीडित डॉक्टर तरूणी सावेडी उपनगरात राहते.गेल्या सोमवार (दि.६ एप्रिल) रोजी सकाळी त्या येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात जिल्हा शल्सचिकित्सक यांच्या कार्यालयासमोर नोकरीचा अर्ज देण्यासाठी आल्या होत्या. यावेळी हर्षद चावला याने त्यांचा पाठलाग केला. पीडितेने विचारणा केली असता, त्याने आपण वकील असून राजकीय लोकांशी संबंध असल्याचे सांगितले. पीडितेचे आणि त्यांच्या डॉक्टर बहिणीचे खासगी व्हिडिओ आपल्याकडे असल्याचे सांगून ते सार्वजनिक करण्याची धमकी त्याने दिली. या व्हिडिओच्या बदल्यात चावला याने पीडितेकडे दोन लाख रूपयांची मागणी केली. पैसे न दिल्यास संपूर्ण कुटुंबाची बदनामी करण्याची आणि दोन्ही बहिणींचे वैद्यकीय क्षेत्रातील करिअर संपवून टाकण्याची धमकी त्याने दिली.

# १६ वर्षीय अल्पवयीन अपहरण झालेल्या मुलीचा पोलिसांकडून शोध

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

अहिल्यानगर पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या सूचना व आदेशानुसार ऑपरेशन मुस्कान अभियाना अंतर्गत अल्पवयीन मुलींचा शोध घेऊन आरोपीस केली अटक. याबाबतच्या सविस्तर माहिती अशी की कोतवाली पोलीस ठाणे हद्दीतील एका अल्पवयीन मुलगी (वय-१६ वर्ष) ही गेल्या दि.९ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजेच्या सुमारास संशयित आरोपी प्रकाश सावंत (रा. बोल्हेगाव,अहिल्यानगर) याने सदर मुलीचे अपहरण केलेबाबत मुलीच्या पालकांनी कोतवाली पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर 100/2026 BNS 137(2) प्रमाणे दाखल केला होता. सदर संशयित आरोपीने सदर मुलगी हिची अपहरण करून घेऊ गेल्यानंतर त्याचा बराच शोध घेतला असता तो व अल्पवयीन मुलगी ही मिळून येत नव्हते. सदर मुलगी व आरोपी हे श्रीरामपूर शहरात श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन हद्दीत असले बाबत कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांना गोपनीय मिळालेल्या माहितीनुसार त्यांनी सदर माहिती तपासी अधिकारी प्रवीण पाटील यांना कळवल्याने पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांनी पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील, महिला पोलीस कॉन्स्टेबल रोहिणी दरंदले, पोलीस कॉन्स्टेबल याकूब सय्यद, अमोल गाडे, संदीप शेंडगे यांचे पथक तयार करून श्रीरामपूर शहर येथे रवाना केले. तेथील माहितीनुसार सदर पथकाने श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांची मदत घेऊन बारकाईने तपास करून सदर अल्पवयीन मुलगी व आरोपी यांना ताब्यात घेऊन कोतवाली पोलीस स्टेशन येथे घेऊन येऊन सदर आरोपीस सदर गुन्ह्यात अटक केली आहे.पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील हे करीत आहेत. सदर कारवाई अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलिस अधीक्षक वैभव कुलबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी नगर शहर विभाग डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड,पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील महिला पोलीस कॉन्स्टेबल रोहिणी दरंदले, पोलीस कॉन्स्टेबल याकूब सय्यद,अमोल गाडे, संदीप शेंडगे व दक्षिण मोबाईल सेल राहुल गुंडू यांनी केली आहे.

# शासनाच्या योजना नागरिकांपर्यंत पोहोचवा : आमदार दाते

## चास येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर संपन्न



आज संपन्न होत असलेल्या या अभियानाच्या माध्यमातून विविध ९ योजनांतर्गत ८३८ लाभार्थ्यांना थेट लाभ देण्यात आला असून, यासाठी परिश्रम घेतलेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक आभार. तहसील कार्यालयात येणाऱ्या सुमारे ५० टक्के तक्रारी या रस्त्यांशी संबंधित असून जमीन विभाजनामुळे या समस्या अधिक वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर बळीराजा शेतपानंद रस्ते योजना राबवून शेतजमिनीपर्यंत कायमस्वरूपी रस्ते सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांची दळणवळणाची अडचण मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

**- सुधीर पाटील (उपविभागीय अधिकारी)**

पारनेर : (स. गांवकरी)

महसूल विभागाच्या माध्यमातून राज्यातील सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिलांच्या दैनंदिन प्रश्नांचे त्वरित निराकरण व्हावे, तसेच प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान व्हावे या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या ‘श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान’ अंतर्गत आज नगर तालुक्यातील चास येथे मंडळस्तरीय शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिराचे उद्‌घाटन पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. या उपक्रमाद्वारे तास मंडळातील ग्रामीण भागातील नागरिकांना रहिवासी, उत्पन्न व जातीचे दाखले, रेशन कार्ड वाटप, संजय गांधी निराधार योजना, पीएम किसान योजना यांसह विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात आला. तसेच सात-बारा उतारे वाटप, प्रलंबित फेरफार नोंदींचे निराकरण आणि विविध योजनांसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता यासंबंधी कामेही तात्काळ करण्यात आली.

नागरिकांच्या सोयीसाठी महसूल विभागासह कृषी, पंचायत समिती, ग्रामपंचायत, आरोग्य, पशुसंवर्धन, समाजकल्याण, महिला व बालविकास, महावितरण, अन्न व नागरी पुरवठा, परिवहन (एस. टी.), शिक्षण आदी विविध विभागांचे स्वतंत्र स्टॉल उभारण्यात आले होते. यामुळे उपस्थित नागरिकांनी आपल्या अडचणी मांडून तत्काळ मार्गदर्शन व सेवा प्राप्त केली.

यावेळी बोलताना आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले की, “शासनाच्या योजना कागदावर न राहता त्या थेट नागरिकांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत, हा या शिबिरामागचा मुख्य उद्देश आहे. सामान्य नागरिकांना त्यांच्या हक्काच्या सेवा वेळेत आणि सुलभ पद्धतीने मिळणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. अशा शिबिरांमुळे जनतेचा शासनावरचा विश्वास अधिक दृढ होतो आणि प्रशासन खऱ्या अर्थाने लोकाभिमुख बनते.”

या कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार संजय शिंदे, नायब तहसीलदार गौरव दळवी, शिवराज पवार, माजी सभापती रामदास भोर, सरपंच युवराज कार्ले, सरपंच सोनेवाडी विठ्ठलराव दळवी, युवा नेते सिद्धेश आंधळे, वैष्णव पठारे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, सेतु चालक, ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिबिरामुळे नागरिकांच्या अनेक प्रलंबित कामांना गती मिळाली असून प्रशासनाच्या लोकाभिमुख उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंडलाधिकारी रुपाली टेमक यांनी केले.

# आमदार काशिनाथ दाते सरांचा दमदार पुढाकार

## देवीभोयरे फाटा, सुपा, सारोळा, खडकी रस्ता कामातील सुधारणांना मंत्रालयातून हिरवा कंदील



पारनेर : (स. गांवकरी)

पारनेर-नगर मतदारसंघातील रस्ते व वाहतूक समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी आमदार काशिनाथ दाते सरांनी घेतलेला पुढाकार निर्णायक ठरत असून, त्यांनी लेखी पत्राद्वारे केलेल्या मागणीनुसार मंत्रालय, मुंबई येथे आयोजित केलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उच्चस्तरीय बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत आमदार दाते सरांनी स्थानिक नागरिकांच्या दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या देवीभोयरे फाटा, सुपा, सारोळा, खडकी रस्ता कामातील सुधारणां- संदार्भातील मागण्या ठामपणे मांडत प्रशासनाला ठोस निर्णय घेण्यास भाग पाडले.

बैठकीत सुपा चौक ते MIDC चौक हा सबंधित प्रकल्पातून वगळला गेलेला भाग मे. चेतक एंटरप्राइजेस लि. यांच्या कार्यक्षेत्रात येत असल्याने त्या भागाचे रुंदीकरणसह मुख्य कामासोबतच पूर्ण करण्याच्या केलेल्या मागणीवर झालेल्या चर्चेत सबंधित रस्ता मे. चेतक एंटरप्राइजेस लि.ने पूर्ण करण्याची जबाबदारी स्वीकारली. त्याचबरोबर पारनेर शहरातील पानोली चौक ते कान्हुर चौक दरम्यानचा भागही सबंधित प्रकल्पात समाविष्ट नसल्याचे व त्या रस्त्याची सुधारणा करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आणून दिल्यावर मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सबंधित कामाचे अंदाजपत्रक तयार करण्याचे आदेशित करत सबंधित काम पूर्ण करून देण्याचे मान्य केले. याचबरोबर देवीभोयरे फाटा, सुपा, सारोळा, खडकी या रस्त्यावरील मौजे सारोळा कासार, ता. नगर येथे सबंधित प्रकल्पाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी आवश्यक RUB (रेल्वे अंडर ब्रिज) ची मागणी व गरज आमदार दाते यांनी निदर्शनास आणून दिल्यावर मंत्री महोदयांनी नवीन RUB (रेल्वे अंडर ब्रिज) उभारण्यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम अधिकारी व रेल्वे सकारात्मकता दर्शवत पुढील कार्यवाही करण्यासंदर्भातही सबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. या बैठकीत सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव राजभोज, सचिव (रस्ते) सार्वजनिक बांधकाम विभाग बोरसे, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग नाशिकचे मुख्य अभियंता प्रशांत भोये, पुणे रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक पैठणकर, सार्वजनिक बांधकाम मंडळ अहिल्यानगरचे अधीक्षक अभियंता म्हाळुंगे, सार्वजनिक बांधकाम विभाग अहिल्यानगरचे कार्यकारी अभियंता जाधव, सार्वजनिक बांधकाम उपविभाग पारनेरचे उपकार्यकारी अभियंता वसईकर तसेच चेतक एन्टरप्रायजेसचे भोसले, राजपथचे चव्हाण इ. अधिकारी उपस्थित होते. सर्व विभागांमध्ये समन्वय साधून ही कामे जलदगतीने पूर्ण करण्यावर भर देण्यात यावा अशा सूचना त्यांना यावेळी देण्यात आल्या. आमदार काशिनाथ दाते सरांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि ठाम नेतृत्वामुळे पारनेर-नगर मतदारसंघाच्या विकासाला नवे बळ मिळत असून, यानिमित्ताने अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेले व नागरिकांची प्राधान्याने मागणी असलेले हे प्रश्न मार्गी लागण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)